**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १६ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास सोयाबीनला सात हजार रुपये हमीभाव देणार-धामणगावच्या प्रचारसभेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं आश्वासन.**
2. **राहुल गांधी विरोधी पक्ष नेता झाल्यानंतर संसदेत संवादाचा स्तर खाली गेल्याचा केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री आणि भाजपाचे नेते किरण रिजिजू यांचा आरोप.**
3. **मुंबईतील धारावी झोपडपट्टी अदानीला दिलेली नसून डीआरपी तिचा विकास करीत असल्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्टोक्ती, गडचिरोलीला काँग्रेसने मागास ठेवल्याची टीका.**
4. **विदर्भ आणि मराठवाड्यात महायुती सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसोबत अन्याय करत असल्याचं काँग्रेस प्रवक्ते आणि महासचिव रणदीपसिंग सुरजेवाला यांच प्रतिपादन.**

---

**राहुल गांधी प्रचारसभा**

**राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास सोयाबीनला सात हजार रुपये हमीभाव तसंच कांद्याला विशेष समिती नेमून योग्य भाव देण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, असं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिलं. ते आज अमरावती जिल्ह्यात धामणगाव रेल्वे इथं प्रचारसभेत बोलत होते. देशाच्या विकासात काँग्रेसनं अमूल्य योगदान दिलं असून काँग्रेस नेहमीच शेवटच्या घटकाचा सर्वात आधी विचार करते, असं ते म्हणाले. शेतकऱ्यांचं ७० हजार कोटी रुपयांचं कर्ज आम्ही माफ केलं होतं; परंतु भाजपा सरकारने २५ अब्जाधीशांचं १६ लाख कोटींचं कर्ज माफ केल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकरी, मजूर, महिला यांना हे पैसे मिळतील, असे प्रयत्न आम्ही करणार असून ते कधीही अब्जाधीशांच्या घशात जाऊ देणार नाही, असं त्यांनी सांगितलं. पंतप्रधानांनी अब्जाधीशांसाठी नव्हे तर देशातील गरिबांसाठी काम करायला हवं, असं ते म्हणाले.**

---

**मोदी दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून नायजेरिया, ब्राझील आणि गयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सहा दिवसांच्या या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात पंतप्रधान नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला अहमद टिनुबू यांच्या निमंत्रणावरून नायजेरियाला जाणार आहेत. गेल्या १७ वर्षांत भारताच्या पंतप्रधानांची ही पहिलीच नायजेरिया भेट असेल. त्यानंतर G-20 शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी मोदी १८ तारखेला ब्राझीलच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. जी-20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोदी अनेक नेत्यांना भेटणार आहेत. तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात मोदी १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत गयानाचा दौरा करणार आहेत. १९६८ नंतर एखाद्या भारतीय पंतप्रधानांची ही गयानाची पहिलीच भेट असेल. मोदी गयानाचे अध्यक्ष अली यांच्याशी चर्चा करतील. गयानात जॉर्ज टाउनमध्ये मोदी दुसऱ्या कॅरिकॉम -इंडिया शिखरपरिषदेत सहभागी होतील.

-----------------------------------------

मेरा बूथ सबसे मजबूत

समाजातल्या प्रत्येक घटकाच्या सक्षमीकरणासाठी राज्यातल्या महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षात प्रयत्न केले असून जनता सरकारच्या कामाबद्दल पूर्ण समाधानी असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. त्यांनी आज नमो ॲपच्या माध्यमातून राज्यातल्या भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद साधला. 'मेरा बूथ सबसे मजबूत' ही या संवादामागची संकल्पना होती. मतदारांना भाजपाच्या संकल्पाची माहिती समजावून सांगून भाजपाला मतदान करण्याचं आवाहन प्रेमानं करावं, असं मोदी यांनी मार्गदर्शन करताना सांगितलं. महाराष्ट्रातल्या जनतेचं प्रेम आपण अनुभवलं असून महायुतीचं सरकार पुन्हा एकदा सत्तेत येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे भाजपासाठी अनुकूल वातावरण असल्याचं ते म्हणाले. भाजपा सुरुवातीपासून मध्यमवर्गाच्या आकांक्षांवर लक्ष केंद्रित करत असून देशाच्या अर्थव्यवस्थेत मध्यमवर्गाचं योगदान सगळ्यात जास्त आहे, हे लक्षात घेऊन त्यांच्यावरचा कराचा बोजा कमी केल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

-----------------------------------------

किरेन रिजीजू

राहुल गांधी विरोधी पक्ष नेता झाल्यानंतर संसदेत चर्चेचा आणि संवादाचा स्तर खाली गेल्याचा आरोप केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री आणि भाजपाचे नेते किरण रिजिजू यांनी केला. ते आज नागपुरात भाजपा कार्यालयात आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते. ज्या काँग्रेसनं डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न पुरस्कार द्यायला

इतका विलंब केला आणि आणीबाणीच्या माध्यमातून संविधानाचा अपमान केला, अशा काँग्रेसला संविधान, दलित, आदिवासी शब्द उच्चारण्याचा अधिकार नाही, असंही ते म्हणाले. या हिवाळी अधिवेशनात वक्फ सुधारणा विधेयक पारित करून गरीब मुसलमानांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देऊ, असंही त्यांनी सांगितलं. महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त सकल राष्ट्रीय उत्पादन देणारं राज्य असून मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. महायुती सरकारने थेट लाभ हस्तांतरणच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेला विविध योजनांचा लाभ मिळवून दिला असल्याचं प्रतिपादन रिजेजू यांनी केलं. गेल्या दहा वर्षात नागपूरमध्ये मेट्रो तसेच इतर पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या असून नागपूर हे सर्वात जास्त वेगाने विकास करणारं शहर म्हणून उदयास आल्याचं देखील त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

---------------------------------------

रामदास आठवले

लोकसभेप्रमाणे विधानसभेत यंदा संविधानाचा मुद्दा चालणार नाही. संविधान बदलण्याचा चुकीचा प्रचार राहुल गांधी यांनी थांबवून विकासाच्या मुद्द्यावर बोलावं, असं प्रतिपादन रिपब्लिकन पक्ष -आठवले गटाचे प्रमुख केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नागपुरात एका पत्रपरिषदेत केलं. महायुती सरकारने आणलेल्या योजनांचा महिलांना फायदा झाला असून लाडकी बहीण योजना लाभदायक ठरल्याचे ते म्हणाले. याशिवाय विविध घटकांसाठी सरकारने आणलेल्या योजनांचा फायदा लोकांना झाला आहे, असं सांगून अल्पसंख्याक, दलित आणि मागास वर्गातील मतदारांना काँग्रेस पक्ष भडकवत असल्याची टीका त्यांनी यावेळी केली. विदर्भात रिपब्लिकन पक्ष मजबूत असून आपण देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघात देखील सभा घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्राबाहेर आपल्या पक्षाला चांगलं यश मिळत असून राज्यात देखील पक्षाचं अस्तित्व बळकट व्हावं, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

---------------------------------------

वंचित बहुजन आघाडी

वंचित बहुजन आघाडी सत्तेत जायचा प्रयत्न करेल, असं वक्तव्य पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केलं. आता तत्वांचं राजकारण संपलं असून संधीसाधू राजकारण सुरू झालं आहे, असं आंबेडकर म्हणाले. महाराष्ट्रात शेतमालाचे भाव पडले आहेत. त्यावर आज कुणीही बोलत नाही, तर

धर्माच्या नावाने मतं मागितली जात आहेत. जातीजातीत फूट पाडली जात आहे, असंही आंबेडकर म्हणाले.

-----------------------------------------

देवेंद्र फडणवीस नागपूर

धर्माचा वापर करून शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेस पक्ष करत असलेला वोट जिहाद अत्यंत खेदजनक असल्याची प्रतिक्रिया भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात दिली. उलेमा कौन्सिलचे प्रमुख सज्जाद नोमानी यांच्यातर्फे करण्यात आलेल्या 17 मागण्या देखील अतिरेक करणाऱ्या आहेत, असे ते म्हणाले. 2012 ते 2024 या दरम्यान महाराष्ट्रात ज्या दंगली झाल्या, त्यात सहभागी असलेल्या मुस्लिमांवरील खटले मागे घ्या, आरएसएसवर बंदी लावा, मुस्लिमांना 10% आरक्षण द्या, अशा काही मागण्या त्यात आहेत. आणि या पक्षांनी या सर्व मागण्या आम्ही मान्य करू, असं सांगितलं आहे. आता सज्जाद नोमानी अपील करत आहेत की 'व्होट जिहाद' करा. हे एक प्रकारे केवळ ध्रुवीकरण करण्यासाठी, अल्पसंख्यांक मतं मिळवण्याकरता अशाप्रकारे जर विरोधी पक्ष काम करत असेल, तर या विरोधात निश्चितपणे आपल्या सर्वांना एक व्हावेच लागेल, असे फडणवीस म्हणाले. नोमानींचा दुसरा व्हिडिओ आज आला असून त्यामध्ये ते म्हणतात की लोकसभेत काही मुस्लिम सभासदांनी भाजपाला मतदान केलं, त्या लोकांना शोधून काढा आणि त्यांना सोशल बॉयकट करा. हा एक प्रकारे एक्स्ट्रीम पोलरायझेशन करण्याचा प्रयत्न असून महाविकास आघाडी हे जे काही करते, त्याला आम्ही निश्चितपणे उत्तर देऊ, असे देखील फडणवीस म्हणाले.

-----------------------------------------

'आढावा विधानसभा मतदारसंघांचा

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरून प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज कोल्हापूर जिल्हयातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

-----------------------------------------

फडणवीस सभा

मुंबईतील धारावी झोपडपट्टी अदानीला दिलेली नसून डीआरपी तिचा विकास करीत आहे. त्यात सरकारची भागीदारी असून सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे होत असल्याची स्पष्टोक्ती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गडचिरोली जिल्हयातील देसाईगंज इथं माध्यमांशी बोलताना दिली. फडणवीस यांनी आज देसाईगंज इथं

भाजप महायुतीचे उमेदवार कृष्णा गजबे यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेला संबोधित केलं. अनेक वर्ष काँग्रेसचं सरकार होतं; परंतु धारावीचा कुठलाही विकास त्यांनी केला नाही, अशी टीका फडणवीस यांनी केली. सोबतच धारावीच्या कंत्राटाची प्रक्रिया ही उद्धव ठाकरेंनी पार पाडली, असे देखील त्यांनी सांगितले. जाहीर सभेत बोलताना फडणवीस यांनी काँग्रेस सरकारवर टीका केली. काँग्रेसने गडचिरोली सारख्या मागास जिल्ह्याचा विकास केला नाही, असं ते म्हणाले. सरकारने पीक विम्यासाठी आठ हजार कोटी रुपये दिले. महायुतीचं सरकार आल्यास शेतकऱ्यांना 25 हजार रुपये देण्यात येतील आणि संपूर्ण कर्जमाफी करण्याचा विचार सरकारचा आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

-----------------------------------------

रणदीपसिंग सुरजेवाला पत्रकार परिषद

विदर्भ आणि मराठवाड्यात महायुती सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या सोबत महायुती अन्याय करत असल्याचा आरोप करून काँग्रेसचे प्रवक्ते आणि महासचिव रणदीपसिंग सुरजेवाला यांनी आज नागपुरात सांगितलं की, सोयाबीनची आधारभूत किंमत 4 हजार 892 रुपये प्रतिक्विंटल आहे; परंतु गेल्या दोन महिन्यांपासून सोयाबीन पिकाला केवळ 3 हजार रुपये प्रति क्विंटल विकण्यासाठी शेतकरी हतबल झालेला आहे. सोयाबीन लागवड ही महाराष्ट्रात सुमारे 73 लाख टन असून महाराष्ट्र सरकार केवळ 13 लाख टन सोयाबीन एम एस पी म्हणजेच आधारभूत किमतीवर खरेदी करण्याची परवानगी देत असल्यामुळे 74 टक्के सोयाबीन पिकाला उचल मिळणार नाही, असे देखील त्यांनी सांगितलं. सोयाबीन तेलाची आयात 2013-14 मध्ये 8 हजार कोटी रुपये होती. ती 2022 -23 मध्ये 47 हजार कोटीपर्यंत पोहोचल्याचे देखील त्यांनी सांगितलं. या सर्व विरोधाभासी स्थितीमुळे सोयाबीन शेतकऱ्यांचे नुकसान होत असून महाविकास आघाडी सत्तेवर आल्यास सोयाबीन शेतकऱ्यांना 7 हजार रुपये प्रति क्विंटल आधारभूत किंमत देण्याचा पुनरुच्चारही त्यांनी केला.

-----------------------------------------